ePaper

# माझी नार्को टेस्ट करा, रणजितसिंह निंबाळकरांचे आव्हान

| वर्ष - 9 | अंक -72 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज™

## आतील पानांत


- महिला क्रिकेटच्या नव्या पर्वाची नांदी!
- रोहितसारखं आयकॉनिक सेलिब्रेशन
- डिजिटल अटकप्रकरणी कठोर कारवाई
- घराणेशाहीचा भारतीय लोकशाहीला धोका


www.mahaenews.com | मंगळवार, दि. 4 नोव्हेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## ईडीची मोठी कारवाई अनिल अंबानींच्या पाली हिल बंगल्यासह ४० हून अधिक मालमत्ता जप्त

# 3 हजार कोटींच्या मालमत्तांवर टाच!

## २० हजार कोटींच्या आर्थिक गैरव्यवहार चौकशीत मोठी हालचाल

| मुंबई | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**रिलायन्स ग्रुपचे अध्यक्ष अनिल अंबानी यांच्यावर अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) मोठी कारवाई करत सुमारे ३ हजार कोटी रुपयांच्या मालमत्तांवर टाच आणली आहे. या कारवाईत मुंबईतील पाली हिल येथील आलिशान बंगला, दिल्लीतील रिलायन्स सेंटर, तसेच पुणे, ठाणे, हैदराबाद, चेन्नई, नोएडा आणि गाझियाबाद येथील मालमत्तांचा समावेश आहे. एकूण ४० हून अधिक मालमत्तांवर जप्तीचे आदेश जारी करण्यात आले असून, त्यांची किंमत सुमारे ₹३,०८४ कोटी इतकी असल्याचे ईडीच्या निवेदनात नमूद केले आहे.**



### पाली हिल बंगला झाला 'सील'

मुंबईतील वांद्रे पाली हिल परिसरात सुमारे १६,००० चौरस फूट क्षेत्रात उभारलेले अंबानी यांचे आलिशान निवासस्थान आता ईडीच्या ताब्यात आले आहे. या घरासोबतच, रिलायन्स ग्रुपच्या अनेक कार्यालयीन इमारती आणि जमिनीवरही कारवाई करण्यात आली आहे.ईडीने ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रिव्हेंशन ऑफ मनी लॉन्ड्रिंग अ‍ॅक्ट (PMLA) च्या कलम ५(१) अंतर्गत ही मालमत्ता जप्ती केली. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, सार्वजनिक पैशांची वसुली आणि गैरव्यवहारातून मिळालेल्या निधीचा मागोवा घेण्यासाठी ही कारवाई करण्यात आली आहे.

### काय आहे संपूर्ण प्रकरण?

२०१७ ते २०१९ दरम्यान, येस बँकेने रिलायन्स अनिल धीरूभाई अंबानी ग्रुपच्या कंपन्यांना एकूण ३,००० कोटी रुपयांची कर्जे दिली होती. ईडीच्या चौकशीत असे समोर आले की ही कर्जे नंतर विविध शेल कंपन्या आणि संबंधित संस्थांकडे वळवण्यात आली. कर्ज मंजुरी आणि वितरण प्रक्रियेत अनेक अनियमितता आढळल्या — ज्यात अर्ज, मंजुरी आणि निधी वितरण हे सर्व एका दिवशी पूर्ण झाले होते, फील्ड तपासणी टाळण्यात आली आणि कागदपत्रांवर तारीख किंवा सही नव्हती.

ईडीने याला "जाणूनबुजून नियंत्रण अपयश (Deliberate Control Failure)" असे म्हटले असून, या सर्व व्यवहारांमुळे बँक आणि गुंतवणूकदारांना मोठे नुकसान झाल्याचा आरोप आहे.

### २० हजार कोटींच्या गैरवापराचा संशय

रिलायन्स ग्रुपवरील ईडीच्या चौकशीत आणखी मोठ्या रकमेचा गैरवापर उघडकीस आला आहे. अनिल अंबानी यांच्या ग्रुपवर २० हजार कोटी रुपयांच्या फंड्सचा गैरवापर केल्याचा ठपका आहे. यामध्ये रिलायन्स होम फायनान्स लिमिटेड (RHFL) आणि रिलायन्स कमर्शियल फायनान्स लिमिटेड (RCFL) यांचा विशेष उल्लेख आहे.

२०१७ ते २०१९ दरम्यान, येस बँकेने RHFL मध्ये ₹२,९६५ कोटी आणि RCFL मध्ये ₹२,०४५ कोटी गुंतवले होते. मात्र डिसेंबर २०१९ पर्यंत हे सर्व अनुत्पादक मालमत्ता (NPA) ठरले. RHFL चे थकित कर्ज ₹१,३५३ कोटी, तर RCFL चे ₹१,९८४ कोटी आहे — म्हणजेच येस बँकेला एकूण ₹२,७०० कोटींचा तोटा सहन करावा लागला.

### सीबीआय आणि इतर संस्थाही सक्रिय

या संपूर्ण प्रकरणात सीबीआयने दोन वेगवेगळे एफआयआर दाखल केले आहेत — जे येस बँकेने RHFL आणि RCFL ला दिलेल्या कर्जांशी संबंधित आहेत. या प्रकरणात येस बँकेचे माजी सीईओ राणा कपूर यांचेही नाव आहे.

याशिवाय, नॅशनल हाऊसिंग बँक (NHB), सेबी, नॅशनल फायनान्शियल रिपोर्टिंग अथॉरिटी (NFRA) आणि बँक ऑफ बडोदा यांसारख्या संस्थांनीही ईडीला महत्त्वपूर्ण माहिती दिली आहे. या सर्व तपासांचा उद्देश म्हणजे, सार्वजनिक बँक निधीचा गैरवापर थांबवणे आणि त्यातून झालेल्या नुकसानीची वसुली सुनिश्चित करणे.

### देशभरातील जप्त मालमत्ता

ईडीच्या जप्त यादीत दिल्ली, नोएडा, गाझियाबाद, मुंबई, पुणे, ठाणे, हैदराबाद, चेन्नई, कांचीपुरम आणि पूर्व गोदावरी या ठिकाणांचा समावेश आहे. या सर्व ठिकाणी रिलायन्स ग्रुपच्या मालकीच्या ऑफिसेस, जमीन आणि निवासी युनिट्स आहेत. यातील सर्वात उच्च-प्रोफाइल मालमत्ता म्हणजेच मुंबईतील पाली हिल येथील आलिशान बंगला, जो आता जप्त करण्यात आला आहे.

### "सार्वजनिक पैशांचे संरक्षण"

ईडीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मते, "या कारवाईचा उद्देश केवळ आरोपींवर दबाव आणणे नाही, तर सार्वजनिक पैशांचे संरक्षण आणि वसुली सुनिश्चित करणे हा आहे." ईडी आता गुन्ह्यातून मिळालेल्या निधीचा मागोवा घेऊन अधिक मालमत्ता जप्तीच्या तयारीत आहे. या तपासाचा विस्तार दक्षिण भारतातील काही मोठ्या औद्योगिक भागांपर्यंत पोहोचला असून, काही नव्या कंपन्यांची नावेही समोर येत आहेत.

### सीबीआय व ईडी समन्वयाने तपास

सीबीआयने आधीच रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेड आणि संबंधित कंपन्यांविरुद्ध १३,६०० कोटी रुपयांच्या कर्ज फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. ईडीचा चालू तपास हाच या प्रकरणाचा पुढील टप्पा मानला जात आहे. मालमत्ता जप्त करून मिळणाऱ्या वसुलीचा फायदा अखेरीस सामान्य बँक ग्राहक आणि गुंतवणूकदारांना होईल, असा ईडीचा दावा आहे.

### 'शेल कंपन्यांचा' गुंता उलगडतोय

तपासादरम्यान ईडीला असे आढळले की अनेक शेल कंपन्या एकाच संचालक आणि एकाच पत्त्यावरून चालवल्या जात होत्या.

## भारतातील सर्वात मोठी आर्थिक चौकशी

अनिल अंबानींच्या ३ हजार कोटींच्या मालमत्तांवरील ही जप्ती कारवाई म्हणजे भारतातील सर्वात मोठ्या आर्थिक चौकशांपैकी एक ठरण्याची चिन्हं आहेत. ईडी, सीबीआय आणि इतर संस्थांच्या समन्वयातून सुरू असलेल्या या तपासाचा परिणाम पुढील काही महिन्यांत अधिक स्पष्ट होईल. तथापि, या प्रकरणामुळे उद्योगविश्वात भारी अस्वस्थता निर्माण झाली आहे आणि मनी लॉंड्रिंगविरोधी यंत्रणा आता अधिक आक्रमक झाल्या आहेत, हे स्पष्ट दिसते.

## १५ किलोमीटर वाहनांच्या रांगा — संतप्त नागरिकांनी महामार्ग अडवला

# बिबट्या हल्ल्यात 13 वर्षांचा मुलगा ठार

### लहान मुले, वृद्ध नागरिक अडकून पडले







### प्रवाशांच्या अक्षरशः हाल झाले

प्रवाशांच्या अक्षरशः हाल झाले आहेत. याची दखल सरकारकडून घेणे गरजेचे आहे. अन्यथा रास्ता रोको आंदोलन अधिक उग्र रूप घेण्याची शक्यता आहे. पुणे जिल्ह्यातील बिबट्यांच्या हल्ल्यांबाबत ठोस उपाययोजना करण्यासंदर्भात उद्या (०४ नोव्हेंबर) रोजी मुंबईत मंत्रालय येथे बैठक पार पडणार आहे. ही बैठक उद्या सकाळी साडेदहा वाजता होणार आहे. बिबट्यांच्या हल्ल्यात गेल्या दहा दिवसांमध्ये दोन मुलांचा मृत्यू झाला.

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**बिबट्याच्या हल्ल्यात तेरा वर्षीय मुलगा ठार झाल्यानंतर नागरिक आक्रमक झाले आहेत. संतप्त नागरिकांनी मंचर येथे पुणे- नाशिक महामार्गावर सुरू केलेल्या रास्ता रोकोमुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. महामार्गावर आंदोलकर्ते झोपलेले आहेत. पुणे- नाशिक महामार्ग ठप्प झाला आहे. वाहनांच्या १० ते १५ किलोमीटर पर्यंत रांगा लागल्या आहेत. प्रवाशांचे अक्षरशः हाल होत आहेत. लहान मुले, वृद्ध नागरिक अडकून पडले आहेत.**

प्रवाशांना पर्यायी मार्ग देखील नसल्याने रास्ता रोको संपण्याची वाट बघावी लागत आहे. जोपर्यंत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार आणि वनमंत्री घटनास्थळी भेट देत नाहीत तोपर्यंत रास्ता रोको मागे घेणार नाहीत, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली आहे.शिरूरमधील पिंपरखेड येथे बिबट्याचा हल्ल्यात १३ वर्षीय रोहन विलास बोंबे चा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर नागरिक आक्रमक झाले आहेत. मंचर येथे संतप्त नागरिकांनी रास्ता रोको आंदोलन केले असून बारा तासानंतर ही सुरू आहे. यामुळे पुणे- नाशिक महामार्ग ठप्प झाला आहे. पुण्याकडून नाशिक च्या दिशेने आणि नाशिकहून पुण्याच्या दिशेने किमान १० ते १५ किलोमीटर वाहनांची रांग लागली आहे.

१२ तासांपासून हजारो प्रवाशी अडकून पडले आहेत. प्रवाशांच्या अक्षरशः हाल झाले आहेत. याची दखल सरकारकडून घेणे गरजेचे आहे. अन्यथा रास्ता रोको आंदोलन अधिक उग्र रूप घेण्याची शक्यता आहे. पुणे जिल्ह्यातील बिबट्यांच्या हल्ल्यांबाबत ठोस उपाययोजना करण्यासंदर्भात उद्या (०४ नोव्हेंबर) रोजी मुंबईत मंत्रालय येथे बैठक पार पडणार आहे. ही बैठक उद्या सकाळी साडेदहा वाजता होणार आहे. बिबट्यांच्या हल्ल्यात गेल्या दहा दिवसांमध्ये दोन मुलांचा मृत्यू झाला.

पिंपरखेड येथील घटनेनंतर ग्रामस्त संतप्त झाले होते. घराजवळ खेळत असलेल्या १३ वर्षीय रोहनवर दबा धरून बसलेल्या नरभक्षक बिबट्याने हल्ला करत त्याला ठार केले आहे. घटनेनंतर आक्रमक झालेल्या नागरिकांनी वनविभागाची गाडी आणि कार्यालय पेटवून दिलं होतं. पुणे – नाशिक महामार्गावर रास्ता रोको करण्यात आला होता. अखेर याप्रकरणी आणि पुणे जिल्ह्यातील जुन्नर आणि परिसरातील बिबट्यांच्या हल्ल्याप्रकरणी दाखल घेऊन मंत्रालयात बैठकीचे नियोजन करण्यात आलं आहे. बैठकीला स्थानिक माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, खासदार अमोल कोल्हे, दादाराव केचे, शरद सोनवणे, हेमंत ओगले, अतुल बेनके, वसंतराव जाधव, देवदत्त निकम, सत्यजित शेरकर, वन विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान प्रमुख वन संरक्षक यांच्या उपस्थित बैठक पार पडणार आहे. बिबट्यांच्या हल्ल्यांविषयी ठोस उपाययोजना करण्यात येईल अशी अपेक्षा स्थानिकांनी व्यक्त केली आहे.प्रवाशांना पर्यायी मार्ग देखील नसल्याने रास्ता रोको संपण्याची वाट बघावी लागत आहे. जोपर्यंत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार आणि वनमंत्री घटनास्थळी भेट देत नाहीत तोपर्यंत रास्ता रोको मागे घेणार नाहीत, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली आहे.शिरूरमधील पिंपरखेड येथे बिबट्याचा हल्ल्यात १३ वर्षीय रोहन विलास बोंबे चा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर नागरिक आक्रमक झाले आहेत. मंचर येथे संतप्त नागरिकांनी रास्ता रोको आंदोलन केले असून बारा तासानंतर ही सुरू आहे. यामुळे पुणे- नाशिक महामार्ग ठप्प झाला आहे. पुण्याकडून नाशिक च्या दिशेने आणि नाशिकहून पुण्याच्या दिशेने किमान १० ते १५ किलोमीटर वाहनांची रांग लागली आहे. १२ तासांपासून हजारो प्रवाशी अडकून पडले आहेत.

# गुन्हेगारी टोळ्यांच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी

## पोलीस आयुक्तांचा आदेश; प्राप्तीकर विभागाला माहिती पाठविण्याच्या सूचना




### माध्यमातील गुंडगिरीला चाप

मालमत्तांची चौकशी केली जाणार आहे. संबंधित माहिती प्राप्तीकर विभागाला दिली जाणार आहे. त्यामुळे या गुन्हेगारांची आर्थिक रसद तोडण्यात येणार आहे. त्यादृष्टीने पोलिसांनी माहिती घेण्यास सुरुवात केली आहे.दरम्यान, नीलेश घायवळ टोळीचे आर्थिक व्यवहार अमोल लाखे सांभाळत असल्याचे तपासात उघडकीस आल्यानंतर त्याला नुकतीच अटक करण्यात आली. एका पवनचक्की प्रकल्पासाठी लाखेच्या कंपनीला दिलेल्या कंत्राटामागे घायवळने दबाव टाकल्याची माहिती प्राथमिक तपासात मिळाली आहे.

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कोथरूडमधील गोळीबार प्रकरण, नाना पेठेतील टोळीयुद्धातून भरदिवसा झालेले खुनाच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी टोळ्यांचे म्होरके, साथीदारांविरुद्ध कडक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.**

कोथरुडमधील नीलेश घायवळ, गजानन मारणे, बंडू आंदेकर, टिपू पठाण या टोळ्यांना होणारी आर्थिक रसद तोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार या टोळ्यांच्या आर्थिक व्यवहारांची आता पोलिसांकडून चौकशी करण्यात येणार असून, प्राप्तीकर विभागाला याबाबतची माहिती दिली जाणार आहे. गणेश विसर्जनाच्या पूर्वसंध्येला नाना पेठेतील टोळीयुद्धातून आयुष कोमकर याचा गोळ्या झाडून आंदेकर टोळीने खून केला. कोथरूड परिसरात घायवळ टोळीतील सराइतांनी एकावर गोळीबार केला. शहरातील संघटित गुन्हेगारी टोळ्यांचा कारवायांना चाप लावण्यासाठी पोलीस आयुक्तालयात नुकतीच बैठक पार पडली. या बैठकीत पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी गुंड टोळ्यांचा बिमोड करण्याचे आदेश दिले. ‘गुंड टोळ्यांचे म्होरके, साथीदारांवर कठोर कारवाई करा. त्यांच्या आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करा. गुंडगिरी, दहशतीच्या बळावर जमविलेले बेकायदा मालमत्तेची माहिती संकलित करावी. ही माहिती प्राप्तीकर विभागाला पाठवावी’, असे आदेश पोलीस आयुक्तांनी दिले आहेगजानन मारणे, बंडू आंदेकर, टिपू पठाण या गुन्हेगारांवर पोलिसांकडून विशेष लक्ष दिले जाणार आहे.

पिंपरी पालिकेचा प्रयोग

वाहतूककोंडीचा नागरिकांना मनस्ताप

# वाहतूककोंडीचा नागरिकांना मनस्ताप!

## पिंपरीतील बॅरिकेटिंग केल्याने बॉटल नेक; वाहतूक कोंडीला निमंत्रण

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे मुंबई महामार्गावरील अहिल्यादेवी होळकर (मोरवाडी चौक) परिसरात प्रशासनाने वाहतूककोंडीच्या दृष्टीने चौक सुधारणा करण्यासाठी सिमेंटचे ब्लॉक टाकून बॅरिकेटिंग केल्याने बॉटल नेकसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे.**



पालिकेच्या वतीने पुणे-मुंबई महामार्गावर पिंपरी ते चिंचवड या भागात अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार रस्ते डिझाईन केला आहे.

यामुळे या भागातील रस्ता अरुंद झाले असून फुटपाथ मोठे झाले आहे.

परिणामी वारंवार वाहतूककोंडी होत आहे. त्यातच आता या चौकात सिमेंटचे ब्लॉक टाकून बॅरिकेटिंग केल्याने बॉटल नेकसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. मोरवाडी न्यायालयाची इमारत ते अहिल्यादेवी होळकर चौकापर्यंत सकाळ आणि संध्याकाळच्या वेळी वाहनांच्या रांग लागत आहेत.

> “ नागरिकांना सुरक्षित रस्ता ओलांडण्यासाठी जंक्शन इम्प्रूव्हमेंट केले आहे. चौकात रिक्षा थांबू नयेत, यासाठी सिमेंटचे ब्लॉक टाकून बॅरिकेडिंग करण्यात आले आहे. जंक्शन इम्प्रूव्हमेंटला पोलीस आयुक्त आणि महापालिका आयुक्तांनी परवानगी दिली आहे. त्यामुळेच त्याची अंमलबजावणी केली जात आहे.
>
> **- बापूसाहेब गायकवाड, सहशहर अभियंता, शहरी दळणवळण विभाग, महापालिका.**

> “ चौकात ब्लॉक बसविल्यास वाहतूककोंडी होईल, असे महापालिका अधिकाऱ्यांना सांगितले होते. मात्र, पालिकेच्या अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले आहे.
>
> **वर्षाराणी पाटील,** वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पिंपरी वाहतूक विभाग.

# शाळा पुन्हा गजबजल्या!

## दिवाळी सुट्टीनंतर सोमवारपासून शाळा पुन्हा सुरू; शिक्षकांकडून विद्यार्थ्यांचे स्वागत

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिकेच्या सर्व प्राथमिक आणि माध्यमिक शाळा दिवाळी सुट्टीनंतर सोमवरपासून पुन्हा सुरू झाल्या आहेत. संकलित चाचणी परीक्षा संपल्यानंतर १७ ऑक्टोबर २०२५ रोजी शाळांना दिवाळीची सुट्टी लागली होती. या सुट्टीनंतर महापालिकेच्या शाळांमध्ये पुन्हा एकदा उत्साह दिसून आला. सकाळपासूनच शाळांच्या गेटबाहेर विद्यार्थ्यांचा गजबजाट, पालकांची लगबग आणि शिक्षकांच्या चेहऱ्यांवरील आनंद दिसत होता.**




आज सुट्टीनंतर शाळा सुरू झाल्यानंतर शाळांमधील वातावरण पुन्हा एकदा आनंद आणि उत्साहाने भरून गेलं. अनेक शाळांमध्ये शिक्षकांनी विद्यार्थ्यांचं स्वागत केलं. शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये गप्पा रंगल्या, सुट्ट्यांमधील अनुभव ऐकवले गेले आणि शिक्षणाचा उत्साह पुन्हा वर्गात उमटला. दरम्यान, दिवाळीनंतरचा हा काळ विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. पुढील परीक्षा, प्रकल्प आणि शैक्षणिक उपक्रमांसाठी हा काळ तयारीचा आहे. त्यासाठी प्रत्येक शाळेत विशेष मार्गदर्शन सत्रं, प्रकल्प स्पर्धा आणि अभ्यासवर्ग घेण्यात येणार आहेत. त्या अनुषंगाने स्मार्ट क्लासरूम, ई-लर्निंग साधनं आणि डिजिटल शिक्षणाच्या माध्यमातून शहरातील शाळांना सक्षम बनविण्यावर महापालिका भर देत आहे. अनेक शाळांमध्ये प्रोजेक्टर, संगणक आणि इंटरनेटच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण दिलं जात आहे, अशी माहिती महापालिकेच्या शिक्षण विभागातून देण्यात आली.




**लोकशाहीमध्ये राष्ट्राच्या विकासात्मक उद्दिष्टांशी जुळवून घेणारी धोरणे आखणाऱ्या राजकीय विचारधारांनाच अखेर लोकांकडून पाठिंबा मिळतो. त्यामुळे 'नेहरूवादी' समाजवादापासून ते स्पर्धात्मक कल्याणवादात झालेले परिवर्तन हे भारताच्या वैविध्यपूर्ण लोकसंख्येच्या विकसित आकांक्षा आणि गरजांशी अनुकूलता दर्शवणारेच आहे आणि ते प्रत्येक निवडणुकीत सिद्ध होते आहे!**

# 'नेहरूवादा'ऐवजी आता कल्याणवाद!



भारतीय राजकारणात अलीकडे झालेला मोठा वैचारिक बदल म्हणजे कल्याणकारी योजनांवर भर देण्यात आला असूनही, आर्थिक वाढीकडे-उद्योगांच्या भरभराटीकडे पुरेसे लक्ष दिले जाते आहे. याला 'स्पर्धात्मक कल्याणवाद' असे म्हणता येईल आणि त्याचा निवडणूक निकालांवरही लक्षणीय परिणाम झाला आहे. भारत जसजसा २०२४ च्या लोकसभा निवडणुकीकडे वाटचाल करत आहे, तसतसे नेहरूवादी समाजवादाचे अपयश आणि 'स्पर्धात्मक कल्याणवादा'चे यश अधिकच स्पष्ट होते आहे. आर्थिक विचारसरणीत होत असलेला हा बदल भारताच्या राजकीय पटलावरील सखोल परिवर्तनाचा द्योतक ठरला आहे. हा बदल केवळ देशाच्या आर्थिक धोरणांमधील महत्त्वपूर्ण उत्क्रांती दर्शवत नाही तर त्याच्या मतदारांच्या उत्क्रांत होणाऱ्या प्राधान्यक्रम आणि आकांक्षांचे प्रमुख सूचक म्हणूनही काम करतो. हा वैचारिक बदल जागतिक आर्थिक आणि राजकीय गतिमानतेमध्ये खोलवर गुंफलेले आहेत, त्यामुळेच आगामी निवडणुकीतील लढत कशी असेल याचा अंदाज येण्यासाठी आणि जगातील सर्वात मोठया लोकशाहींपैकी एक असलेल्या भारतातील मतदारांच्या पसंतींचे बदलते रूप समजून घेण्यासाठी या बदलांकडे पाहिले पाहिजे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली समाजवाद-प्रणीत आर्थिक प्रारूप स्वीकारले. म्हणजेच सरकारच्या नेतृत्वाखालील औद्योगिकीकरण, केंद्रीय नियोजन आणि मिश्र अर्थव्यवस्थेवर भर दिला. नवीन राष्ट्रात उच्चभ्रूंची नवी फळी निर्माण करण्यासाठी जलद औद्योगिकीकरण आणि लायसन्स राजद्वारे नियंत्रित असे मजबूत सार्वजनिक क्षेत्र आवश्यक आहे, असा नेहरूंचा विश्वास हे प्रारूप स्वीकारण्यामागे असावा. हेतू चांगले असूनही, नेहरूंच्या योजनेचा भारताच्या आर्थिक विकासावर आणि सामाजिक कल्याणावर विपरीत परिणाम झाला. सरकारचा हस्तक्षेप, लायसन्स राज आणि अवजड उद्योगांवर भर या साऱ्याच्या परिणामी आर्थिक वृद्धीचा दर (सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या म्हणजेच 'जीडीपी'च्या वाढीचा दर) या सर्व काळात दरवर्षी सरासरी २.१ टक्के इतकाच राहिला. भारतात दारिद्र्याच्या पातळीत लक्षणीय वाढ झाली, मोठया प्रमाणावर निरक्षरता आणि कुपोषण वाढले. या प्रारूपाने कृषी आणि लघु उद्योगांकडे दुर्लक्ष केले, त्यामुळे आर्थिक विकासाचा समतोल ढासळला. प्रमुख क्षेत्रांवर राज्य यंत्रणेच्या नियंत्रणामुळे नवकल्पना थांबली. नेहरूवादावरच पुढेही भर राहिल्यामुळे जागतिक व्यापार आणि उत्पादनातील संधी भारताने गमावल्या. त्यामुळे भारताला एक महत्त्वपूर्ण जागतिक आर्थिक शक्ती बनणे या काळात अशक्यच ठरले, उलट देशामध्ये आर्थिक विषमता, भ्रष्टाचार बोकाळले. धोरणातील या अपयशामुळे भारताच्या प्रगतीला आणखी अडथळा निर्माण झाला. थोडक्यात, नेहरूवादी समाजवाद हा भारताच्या यश आणि समृद्धीमध्ये एक मोठा अडथळा ठरला होता. त्यामुळेच विविध क्षेत्रांमध्ये आपल्या देशाची क्षमता मर्यादित होती आणि त्यामुळे सामाजिक आव्हानेदेखील वाढत होती. नेहरूवादी समाजवादाने भारताची आर्थिक वाढ कुंठित केली, देश जवळपास डबघाईला येण्याकडे वाटचाल करू लागला. त्यामुळेच भारतीय रिझर्व्ह बँकेला अर्थव्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी बँक ऑफ इंग्लंड आणि बँक ऑफ जपानकडे ४६.९१ टन सोने गहाण ठेवावे लागले, या घडामोडी १९८० च्या दशकाच्या अखेरीस घडत होत्या. त्यातून बाहेर पडण्यासाठी १९९१ पासून आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्वीकारावेच लागणार होते कारण अर्थसंकल्पात वाढती तूट, परकी चलनाची गंगाजळी आटलेली आणि जग तर पुढे चाललेले अशी स्थिती त्या वेळी होती.

## प्रासंगिक »

### विश्वविजयातून

***या महिला क्रिकेटपटू देशात महिला सबलीकरणाचे केवळ एक दालन ठरतात. इतर अनेक दालने बंदच आहेत...***

'इट्स जस्ट अ गेम...' या चार इंग्रजी शब्दांनी रविवारी नवी मुंबईत झालेल्या महिला विश्वचषक अंतिम सामन्याचे वर्णन करणे हे भारतीय क्रिकेटपटूंप्रति विलक्षण अन्याय्य आणि कदाचित क्रूरही ठरेल. अश्रू, घाम सांडून नि हाडे, स्नायूंवर अनन्वित ताण देऊन; काही सामन्यांमध्ये पराभव पचवून; खराब कामगिरी वा दुखापतीमुळे विस्कटलेली संघाची घडी पुन:पुन्हा बसवून; प्रत्येकीने वैयक्तिक सुखदु:ख आणि यशापयश पचवून अंतिमत: संघासाठी आणि देशासाठी विजयी उद्दिष्ट ठेवून भारतासाठी पहिलेवहिले महिला जगज्जेतेपद खेचून आणले. नैराश्याचे क्षण अनेकींच्या पदरी आले. पण ते नैराश्य जोजवत या बसल्या नाहीत. उपान्त्य सामन्याची मानकरी ठरलेल्या जेमिमा रॉड्रिग्जला या स्पर्धेतील काही सामन्यांतून वगळण्यात आले होते. अंतिम सामन्याची मानकरी ठरलेल्या शफाली वर्माचा मूळ संघातच समावेश नव्हता.

**यंदाच्या वर्षात ज्या मोजक्या सार्वत्रिक निवडणुकांकडे जगाचे लक्ष लागलेले आहे, त्यांतील एक – तैवानचे अध्यक्ष व कायदेमंडळाची निवडणूक – नुकतीच पार पडली. अजस्र चीनच्या बाजूला वसलेला तैवान हा भलताच चिमुकला देश. पण स्वत:ची स्वायत्तता प्राणपणाने जपणारा.**

# तैवानचा आश्वासक कौल



हाँगकाँग, मकावपाठोपाठ तैवानलाही 'चीनचा अविभाज्य भाग' बनवण्याची चिनी राज्यकर्त्यांची आकांक्षा तशी जुनीच. पण क्षी जिनपिंग यांच्या अमदानीत तिला नवे धारदार धुमारे फुटले आहेत. चीनच्या नवविस्तारवादी धोरणामध्ये तैवानवर कब्जा करणे हे प्राधान्याने येते. तैवानला 'वाचवण्या'चा वसा अमेरिकेने घेतल्यामुळे चीन अधिक बिथरला आहे. जगात सध्या दोन प्रमुख संघर्षबिंदू येतात- युक्रेन आणि पश्चिम आशिया. परंतु तैवानच्या निमित्ताने पूर्व आशियात तिसरा संघर्षबिंदू उद्भवल्यास तो युक्रेन-रशिया आणि इस्रायल-हमासपेक्षा कितीतरी अधिक संहारक ठरेल. कारण या संघर्षांमध्ये अमेरिका आणि चीन या दोन महासत्ता परस्परांना थेट भिडण्याची शक्यता खूपच अधिक आहे. या पार्श्वभूमीवर तैवानमधील सार्वत्रिक निवडणुकांच्या निकालाकडे पाहावे लागेल. सत्तारूढ डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पक्षाचे (डीपीपी) उमेदवार आणि विद्यमान उपाध्यक्ष विल्यम लाय चिंग- ते अध्यक्षीय निवडणुकीत विजयी झाले. डीपीपी हा पक्ष चीनच्या राज्यकर्त्यांना खुपतो, कारण तैवान हा स्वतंत्र, सार्वभौम देश असल्याची डीपीपीची भूमिका आहे. तर तैवान हा चीनचा सार्वभौम भाग असल्याची चीनची सुरुवातीपासूनची भूमिका आहे. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीआधी तैवानच्या मतदारांना हरतऱ्हेने प्रभावित करण्याचा प्रयत्न चीनने करून पाहिला. या निवडणुकीचा कौल म्हणजे शांतता किंवा युद्ध, समृद्धी किंवा ऱ्हास यांपैकी एकाची निवड करण्याचा क्षण असल्याची धमकी चीनने रेटून पाहिली. पण या दडपणाला बळी न पडता, तैवानवासीयांनी पुन्हा एकदा डीपीपीची निवड केली. सलग तिसऱ्यांदा हा पक्ष अध्यक्षीय निवडणुकीत विजयी ठरला असून, तैवानच्या इतिहासात असे प्रथमच घडले. अर्थात हे यश निर्भेळ नाही. कारण कायदेमंडळाच्या निवडणुकीत डीपीपीच्या तुलनेत चायनीज नॅशनलिस्ट पार्टी किंवा कुओमिन्तांग (केएमटी) या पक्षाला अधिक जागा मिळाल्या. हा पक्ष चीनशी जुळवून घेण्यास प्राधान्य देतो.

अशा प्रकारे अध्यक्ष एका पक्षाचा पण कायदेमंडळात बहुमत विरोधी पक्षाचे, अशी रचना झाल्यामुळे तैवानमध्ये राजकीय अस्थैर्य निर्माण होऊ शकते. याचा फायदा घेण्याचा प्रयत्न चीनकडून होणारच. चीनमधील कम्युनिस्ट पक्षाच्या तैवानविषयक प्रवक्त्याने 'डीपीपी मुख्य प्रवाहातील जनतेचे प्रतिनिधित्व करत नाही आणि राष्ट्रीय एकीकरणाचे चीनचे उद्दिष्ट कायम राहील', अशी मोघम प्रतिक्रिया दिली. चीनच्या धमक्यांना बधून डीपीपीपेक्षा केएमटीच्या उमेदवाराची अध्यक्षपदी निवड होईल, अशी चीनची अटकळ होती.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

केंद्रीय पथक राज्यात

केंद्रीय गृह मंत्रालयाचे सहसचिव आर. के. पांडे यांच्या अध्यक्षतेखाली पथक

# नुकसानीच्या पाहणीसाठी पथक

## पिकांच्या नुकसानीची पाहणी करणार

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यांत झालेल्या अतिवृष्टी आणि महापुरामुळे खरीप हंगामातील पिकांच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथक सोमवारी राज्यात दाखल झाले आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाचे सहसचिव आर. के. पांडे यांच्या अध्यक्षतेखाली पथक तीन दिवस राज्यातील नुकसानग्रस्त भागाची पाहणी करणार आहे.**



राज्यात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यांत सर्वदूर अतिवृष्टी झाली. अनेक जिल्ह्यांना महापुराचा फटका बसला. खरीप हंगामातील सुमारे ७० लाख हेक्टरवरील पिकांसह शेतजमीन, रस्ते, सार्वजनिक व वैयक्तिक मालमत्ता, मनुष्य आणि पशुधनाची मोठ्या प्रमाणात हानी झाली आहे. या नुकसानीची पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथक सोमवारी मुंबईत दाखल झाले. दुपारी त्यांनी रिझर्व बँकेला भेट दिली. सायंकाळी राज्य सरकारच्या विविध अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन आहे. पुढील दोन दिवस राज्यातील नुकसानग्रस्त भागाला भेटी देण्याचे नियोजन केले जाणार आहे. या समितीला राज्य अतिथीचा दर्जा देण्यात आला आहे.केंद्र शासनाच्या पथकात विविध विभागांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. गृह मंत्रालयाचे सहसचिव आर. के. पांडे यांच्यासह ए. एल. वाघमारे, संचालक (कृषी आणि शेतकरी कल्याण विभाग), के. वी. पटेल उपसचिव ( व्यय, वित्त विभाग), सत्यंद्र प्रताप सिंग, संचालक (जल शक्ती मंत्रालय), विशाल पांडे कार्यकारी अभियंता (रस्ते, वाहतूक, महामार्ग विभाग), अभिषेक कुमार, अवर सचिव (ग्रामविकास विभाग ), करण सरीन, उप संचालक तसेच डॉ. एस. व्ही. एस. पी. शर्मा, शास्त्रज्ञ, राष्ट्रीय अंतराळ दूरसंवेदन केंद्र (इस्रो) यांचा केंद्रीय पथकात समावेश आहे.केंद्रीय पथकासह राज्याच्या विविध विभागातील वरीष्ठ अधिकारी पुढील दोन दिवस नुकसानग्रस्त भागाची पहाणी करणार आहेत. संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना त्यांना सर्व राजशिष्टाचार विषयक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. प्रामुख्याने धाराशिव, सोलापूर, नाशिक, वाशिम या सर्वाधिक नुकसान झालेल्या जिल्ह्यांत पथकाचा दौरा होण्याची शक्यता आहे.राज्यात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यांत सर्वदूर अतिवृष्टी झाली. अनेक जिल्ह्यांना महापुराचा फटका बसला. खरीप हंगामातील सुमारे ७० लाख हेक्टरवरील पिकांसह शेतजमीन, रस्ते, सार्वजनिक व वैयक्तिक मालमत्ता, मनुष्य आणि पशुधनाची मोठ्या प्रमाणात हानी झाली आहे. या नुकसानीची पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथक सोमवारी मुंबईत दाखल झाले. दुपारी त्यांनी रिझर्व बँकेला भेट दिली. सायंकाळी राज्य सरकारच्या विविध अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन आहे. पुढील दोन दिवस राज्यातील नुकसानग्रस्त भागाला भेटी देण्याचे नियोजन केले जाणार आहे. या समितीला राज्य अतिथीचा दर्जा देण्यात आला आहे.केंद्र शासनाच्या पथकात विविध विभागांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. गृह मंत्रालयाचे सहसचिव आर. के. पांडे यांच्यासह ए. एल. वाघमारे, संचालक (कृषी आणि शेतकरी कल्याण विभाग), के. वी. पटेल उपसचिव ( व्यय, वित्त विभाग), सत्यंद्र प्रताप सिंग, संचालक (जल शक्ती मंत्रालय), विशाल पांडे कार्यकारी अभियंता अभिषेक कुमार, अवर सचिव, करण सरीन, उप संचालक तसेच डॉ. एस. व्ही. एस. पी. शर्मा, शास्त्रज्ञ, राष्ट्रीय अंतराळ दूरसंवेदन केंद्र यांचा केंद्रीय पथकात समावेश आहे. केंद्रीय पथकासह राज्याच्या विविध विभागातील वरीष्ठ अधिकारी पुढील दोन दिवस नुकसानग्रस्त भागाची पहाणी करणार आहेत.

### नुकसानग्रस्त भागाची पाहणी

प्रामुख्याने धाराशिव, सोलापूर, नाशिक, वाशिम या सर्वाधिक नुकसान झालेल्या जिल्ह्यांत पथकाचा दौरा होण्याची शक्यता आहे.राज्यात ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यांत झालेल्या अतिवृष्टी आणि महापुरामुळे खरीप हंगामातील पिकांच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथक सोमवारी राज्यात दाखल झाले आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाचे सहसचिव आर. के. पांडे यांच्या अध्यक्षतेखाली पथक तीन दिवस राज्यातील नुकसानग्रस्त भागाची पाहणी करणार आहे.

# शेलारांनी फडणवीसांना पप्पू ठरवलं

## भाजपात कोणी फडणवीसांविरोधात बोलण्याचं धाडस दाखवत नाही

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीआधी मतदार याद्यांमधील कथित गैरप्रकार आणि मतचोरीचा आरोप करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसह महाविकास आघाडीने आक्रमक भूमिका घेतली आहे. मनसे व मविआने मुंबईत नुकताच 'सत्याचा मोर्चा' काढला.**

यावेळी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मतदार याद्यांमधील कथित घोळ सिद्ध करणारे काही पुरावे व व्हिडीओ दाखवले. याला प्रत्युत्तर म्हणून आज राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री तथा भारतीय जनता पार्टीचे नेते आशिष शेलार यांनी पत्रकार परिषद घेतली. आशिष शेलार यांनी काही मुस्लीम मतदारांच्या नावांमधील घोळ दाखवले. यावरून त्यांनी राज ठाकरे व महाविकास आघाडीवर आरोप केला की विरोधक केवळ हिंदू मतदारांच्या नोंदींमधील घोळ दाखवून व्होट जिहाद करत आहेत.आशिष शेलार यांच्या पत्रकार परिषदेवर शिवसेनेचे (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, "आशिष शेलार यांनी आम्हाला (विरोधक) फुलटॉस चेंडू टाकला आहे. मुळात त्यांनी आमचा आरोप मान्य केला आहे. मतदारयाद्यांमधील घोळ त्यांनी



मान्य केले आहेत." उद्धव ठाकरे यांनी काही वेळापूर्वी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी आशिषे शेलार यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर प्रतिक्रिया दिली.मी आशिष शेलार यांचं जाहीर अभिनंदन करतो. त्यांनी नकळतपणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना महाराष्ट्राचे पप्पू ठरवलं आहे. सहसा भाजपात कोणी फडणवीसांविरोधात बोलण्याचं धाडस दाखवत नाही. परंतु, शेलार यांनी ते धाडस दाखवलं. हा कदाचित त्यांच्यातील अंतर्गत वादाचा परिपाक असेल. आशिष शेलार यांनी पत्रकार परिषद घेतली. आणि राज्यातील मतदार याद्या सदोष असल्याचं मान्य केलं. मुख्यमंत्री बिहारमध्ये निवडणुकीचा प्रचार करून, घसा कोरडा करून आलेले असतानाच शेलार यांनी मुख्यमंत्र्यांना हे आरोपांचं अमृत पाजलंय."आशिष शेलार यांनी सिद्ध केलं आहे की मतदारयाद्यांमध्ये गोंधळ आहेत. त्यांनी आमच्यावर टीका केली असली तरी आमचं एक तरी वाक्य असं दाखवा की आम्ही संपूर्ण याद्यांमध्ये सुधारणा मागत आहोत. कदाचित आशिष शेलार यांची त्यांच्याबरोबर (मुस्लीम) उठबस असेल म्हणून त्यांना मुस्लीम मतदारांच्या सदोष नोंदी सापडल्या.

### ठाकरेंचा शेलारांना चिमटा

शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख म्हणाले, "आम्ही निवडणूक आयोगाकडे मागणी केली आहे की संपूर्ण मतदारयाद्या सदोष असून त्यात सुधारणा करा. मतदारयाद्यांमध्ये सुधारणा होत नाहीत तोवर निवडणुका घेऊ नका. अशा स्थितीत शेलार यांनी आज जे धाडस दाखवलं ते कौतुकास्पद आहे."

## सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण

## तीन हजार कोटींची खंडणी धक्कादायक

# डिजिटल अटकप्रकरणी कठोर कारवाई

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**देशात डिजिटल अटकेची धमकी घेऊन लोकांकडून तीन हजार कोटींपेक्षा जास्त खंडणी उकळण्यात आल्याचा प्रकार धक्कादायक असल्याचे मत सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केले. या गुन्ह्यांवर कठोरपणे कारवाई करण्याची गरज असल्याचेही न्यायालयाने सांगितले. याप्रकरणी न्या. सूर्य कांत, न्या. उज्जल भुइयां आणि न्या. जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठासमोर सोमवारी सुनावणी झाली.**

### पुढील सुनावणी १० नोव्हेंबरला



डिजिटल अटक हा सायबर गुन्ह्याचा वाढता प्रकार असून त्यामध्ये भामटे स्वतःला कायदा अंमलबजावणी किंवा न्यायालय अधिकारी किंवा सरकारी संस्थेचे कर्मचारी असल्याचे भासवतात. ते ऑडिओ व व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून पीडितांना धमकावतात आणि त्यांच्याकडून खंडणी वसूल करतात. त्यासाठी ते पीडितांना ओलीस धरणे, दबाव टाकणे यासारखी कृत्ये करतात. यामध्ये महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या प्रमाणात लक्ष्य करण्यात येते.हरियाणाच्या अंबाला येथील एका ज्येष्ठ महिलेने सरन्यायाधीश न्या. भूषण रामकृष्ण गवई यांना पत्र लिहिले हाते. भामट्यांनी सप्टेंबरमध्ये तिला व तिच्या पतीला कथितरित्या डिजिटल अटक करून त्यांच्याकडून १.०५ कोटी रुपये खंडणीपोटी वसूल केल्याची या पत्रात तक्रार करण्यात आली होती. त्याची दखल घेऊन सर्वोच्च न्यायालयाने याचिका दाखल करून घेतली, तसेच न्यायालयाला मदत करण्यासाठी न्यायमित्रांची नियुक्ती केली. याप्रकरणी न्यायालयाने केंद्रीय गृह मंत्रालय आणि केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) सादर केलेल्या दोन लिफाफाबंद अहवाल अभ्यासले आहेत. गुन्हेगारांच्या टोळ्या परदेशातून कारवाया करतात, तिथे त्यांना वित्तीय, तांत्रिक आणि मनुष्यबळाचे सहाय्य मिळते, याकडे सीबीआयने निर्देश केला असल्याचे न्या. कांत यांनी सांगितले. तर, केंद्रीय गृह मंत्रालयाचा सायबर गुन्ह्यांचा विभाग या समस्येवर उपाययोजना करत आहे, अशी माहिती केंद्र सरकार आणि सीबीआयची बाजू मांडणारे महान्यायअभिकर्ता तुषार मेहता यांनी दिली. याप्रकरणी पुढील सुनावणी १० नोव्हेंबरला होणार आहे. देशभरात ज्येष्ठ नागरिकांसह पीडितांकडून ३,००० कोटींपेक्षा जास्त उकळण्यात आले आहेत, हे धक्कादायक आहे. आम्ही आता कडक आणि कठोर आदेश दिले नाहीत तर ही समस्या मोठ्या प्रमाणात वाढेल. आम्हाला न्यायालयीन आदेशांच्या माध्यमातून आपल्या संस्थांचे हात बळकट करावे लागतील. आम्ही हे गुन्हे कठोरपणे हाताळण्याचा निर्धार केला आहे. डिजिटल अटक हा सायबर

### आता कडक आणि कठोर आदेश

, अशी माहिती केंद्र सरकार आणि सीबीआयची बाजू मांडणारे महान्यायअभिकर्ता तुषार मेहता यांनी दिली. याप्रकरणी पुढील सुनावणी १० नोव्हेंबरला होणार आहे. देशभरात ज्येष्ठ नागरिकांसह पीडितांकडून ३,००० कोटींपेक्षा जास्त उकळण्यात आले आहेत, हे धक्कादायक आहे. आम्ही आता कडक आणि कठोर आदेश दिले नाहीत तर ही समस्या मोठ्या प्रमाणात वाढेल. आम्हाला न्यायालयीन आदेशांच्या माध्यमातून आपल्या संस्थांचे हात बळकट करावे .

गुन्ह्याचा वाढता प्रकार असून त्यामध्ये भामटे स्वतःला कायदा अंमलबजावणी किंवा न्यायालय अधिकारी किंवा सरकारी संस्थेचे कर्मचारी असल्याचे भासवतात. ते ऑडिओ व व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून पीडितांना धमकावतात आणि त्यांच्याकडून खंडणी वसूल करतात. त्यासाठी ते पीडितांना ओलीस धरणे, दबाव टाकणे यासारखी कृत्ये करतात. यामध्ये महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या प्रमाणात लक्ष्य करण्यात येते.हरियाणाच्या अंबाला येथील एका ज्येष्ठ महिलेने सरन्यायाधीश न्या. भूषण रामकृष्ण गवई यांना पत्र लिहिले हाते. भामट्यांनी सप्टेंबरमध्ये तिला व तिच्या पतीला कथितरित्या डिजिटल अटक करून त्यांच्याकडून १.०५ कोटी रुपये खंडणीपोटी वसूल केल्याची या पत्रात तक्रार करण्यात आली होती. त्याची दखल घेऊन सर्वोच्च न्यायालयाने याचिका दाखल करून घेतली, तसेच न्यायालयाला मदत करण्यासाठी न्यायमित्रांची नियुक्ती केली. याप्रकरणी न्यायालयाने केंद्रीय गृह मंत्रालय आणि केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) सादर केलेल्या दोन लिफाफाबंद अहवाल अभ्यासले आहेत.गुन्हेगारांच्या टोळ्या परदेशातून कारवाया करतात, तिथे त्यांना वित्तीय, तांत्रिक आणि मनुष्यबळाचे सहाय्य मिळते, याकडे सीबीआयने निर्देश केला असल्याचे न्या. कांत यांनी सांगितले. तर, केंद्रीय गृह मंत्रालयाचा सायबर गुन्ह्यांचा विभाग या समस्येवर उपाययोजना करत आहे.

# घराणेशाहीचा भारतीय लोकशाहीला धोका


## लोकांच्या सहभागापेक्षा वंशाने ठरवली जाते प्रशासनाची गुणवत्ता

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**घराणेशाहीचे राजकारण भारतीय लोकशाहीसाठी गंभीर धोका आहे, असे मत काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी व्यक्त केले. जेव्हा राजकीय सत्ता ही क्षमता, वचनबद्धता किंवा तळागाळातील लोकांच्या सहभागापेक्षा वंशाने ठरवली जाते तेव्हा प्रशासनाची गुणवत्ता खालावते. नेहरू-गांधी कुटुंब हे काँग्रेसशी संबंधित आहे.**

राजकीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणात घराणेशाही आहे, असे थरूर यांनी आंतरराष्ट्रीय माध्यम संस्था असलेल्या ‘प्रोजेक्ट सिंडिकेट’साठी लिहिलेल्या लेखात नमूद केले आहे. गेल्या काही महिन्यांपासून सरकारच्या परराष्ट्र धोरणाबाबत अनुकूल भाष्य करणाऱ्या थरूर यांच्या या मतांकडे काँग्रेस श्रेष्ठींशी निर्माण झालेल्या दुराव्यातून पाहिले जाते.इंडियन पॉलिटिक्स आर ए फॅमिली बिझनेस’ या शीर्षकाखालील लेखात अनेक दशके एकाच कुटुंबाचा भारतीय राजकारणावर दबदबा राहिला हे स्पष्ट करताना, “नेहरू-गांधी घराण्याचा प्रभाव हा भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासाशी जोडलेला आहे. राजकीय नेतृत्व हा जन्मसिद्ध हक्क असू शकतो ही कल्पनाही दृढ झाली आहे. ही



कल्पना भारतीय राजकारणात प्रत्येक पक्षात, प्रत्येक प्रदेशात आणि प्रत्येक स्तरावर शिरली आहे,” असे थरूर यांनी नमूद केले आहे.घराणेशाहीतून राजकारणात वारसदार पुढे येणे हे सार्वकालिक आहे, असे लिहिताना थरूर यांनी बिजू जनता दल, शिवसेना, समाजवादी पक्ष, लोकजनशक्ती पक्ष, द्रमुक, नॅशनल कॉन्फरन्स, पीडीपी या पक्षांची उदाहरणे दिली. भारतीय उपखंडातही अशा घराणेशाहीचे राजकारण चालते हे स्पष्ट करताना पाकिस्तानातील

### राजकीय नेतृत्व हा जन्मसिद्ध हक्क

गेल्या काही महिन्यांपासून सरकारच्या परराष्ट्र धोरणाबाबत अनुकूल भाष्य करणाऱ्या थरूर यांच्या या मतांकडे काँग्रेस श्रेष्ठींशी निर्माण झालेल्या दुराव्यातून पाहिले जा“नेहरू-गांधी घराण्याचा प्रभाव हा भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासाशी जोडलेला आहे. राजकीय नेतृत्व हा जन्मसिद्ध हक्क असू शकतो.

भुट्टो आणि शरीफ, बांगलादेशातील शेख आणि झिया कुटुंबे आणि श्रीलंकेतील बंदरनायक आणि राजपक्षे यांची उदाहरणे दिली. भारताच्या लोकशाहीशी हे विसंगत दिसते. मग भारताने घराणेशाहीचे हे प्रारूप इतके पूर्णपणे का स्वीकारले आहे? एक कारण म्हणजे कुटुंब एक नाममुद्रा म्हणून प्रभावीपणे काम करू शकते. उमेदवारांना मतदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी कष्ट करावे लागत नाहीत. जर मतदारांनी उमेदवाराच्या घराण्यातील व्यक्तीला यापूर्वी निवडून दिले असेल तर पुढील पिढीलाही ते स्वीकारतील त्यासाठी विश्वासार्हता निर्माण करण्याची आवश्यकता नाही, असे थरूर यांनी लेखात म्हटले आहे.

# आनंदाला वयाचं बंधन नाही!

जुनी गाणी म्हटलं आजही प्रेक्षकांच्या लक्षात राहणारी आणि तितकीच लोकप्रिय. आजही जुनी गाणी रसिकांच्या ओठावर असतात. त्यातच 70 च्या दशकातील गाण्यामध्ये एक वेगळेपणा होता. एक गोडवा होता. त्यामुळे आजही त्या काळातील गाणी लोकांमध्ये खूप लोकप्रिय आहेत. असचं त्या काळातील एक प्रसिद्ध गाणं म्हणजे 'कोई शहरी बाबू दिल लहरी बाबू'. आजही हे गाणं अनेकांना तोंड पाठ असेल. बॉलिवूडमधील ज्येष्ठ अभिनेक्षी मुमताज आणि ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या डान्सचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये मुमताज आणि आशा भोसले या दोघी "कोई सहरी बाबू दिल लहरी बाबू" (गाण्यावर थिरकताना दिसत आहेत. दोघींच्या या व्हिडीओ नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. मुमताज यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये त्या आशा भोसले यांच्यासोबत "कोई सहरी बाबू दिल लहरी बाबू" या गाण्यावर डान्स करताना दिसत आहेत. व्हिडीओमध्ये मुमताज या आशा भोसले यांना डान्स स्टेप्स सांगताना दिसत आहेत. मुमताज यांनी शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये त्या बॅक आऊटफिटमध्ये दिसत आहेत. "कोई सहरी बाबू दिल लहरी बाबू" हे गाणे लोफर या चित्रपटामधील आहे. हे गाणे लक्ष्मीकांत- प्यारेलाल या जोडीने लिहिले आहे आणि आशा भोसले यांनी हे गायले आहे. आजही लोक हे गाण आवडीनं ऐकतात. भीमसिंह दिग्दर्शित लोफर हा चित्रपट 1973 मध्ये रिलीज झाला होता. धर्मेंद्र आणि मुमताज या चित्रपटात मुख्य भूमिकेत होते तर ओम प्रकाश, प्रेमनाथ आणि के एन सिंग यांनी देखील या चित्रपटात काम केलं होतं. "कोई सहरी बाबू

# राणी मुखर्जी पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला

बॉलीवूड अभिनेत्री राणी मुखर्जी पुन्हा एकदा वरिष्ठ निरीक्षक शिवानी शिवाजी रॉय या भूमिकेत झळकण्यासाठी सज्ज झाली आहे. शुक्रवारी 'मर्दानी ३' चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. या चित्रपटात प्रेक्षकांना पुन्हा एकदा राणी मुखर्जीचा भारदस्त अभिनय पाहता येणार आहे.'मर्दानी २' रिलीजच्या वर्धापन दिनानिमित्त यश राज फिल्म्सने 'मर्दानी ३'ची घोषणा करत एक पोस्टर शेअर केलं आहे. तसेच कॅप्शनमध्ये लिहिलं, "प्रतीक्षा संपली! 'मर्दानी ३'मध्ये राणी मुखर्जी पुन्हा एकदा शिवानी शिवाजी रॉय या भूमिकेत दिसणार आहे. २०२६ मध्ये चित्रपटगृहांत." राणी मुखर्जीच्या 'मर्दानी ३' चित्रपटाची चाहते गेल्या अनेक दिवसांपासून वाट पाहत आहेत. हा चित्रपट २०२६ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. याची नेमकी तारीख अद्याप समोर आलेली नाही.'मर्दानी ३' चित्रपटाचे दिग्दर्शन अभिराज मीनावाला करणार आहे, तर निर्मिती आदित्य चोपडा करणार आहे. अभिनेत्री राणी मुखर्जीने यावर तिची प्रतिक्रिया दिली आहे. तिने म्हटलं, "मला ही घोषणा करताना फार आनंद होत आहे की, आम्ही २०२५ मध्ये 'मर्दानी ३' चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात करत आहोत. पोलिसांच्या वर्दीत अशा भूमिका साकारणे प्रत्येक कलाकारासाठी एक अभिमानाची गोष्ट असते, मझ्यासाठीदेखील ही फार मोठी गर्वाची गोष्ट आहे. आजवर मोठ्या हिमतीने सर्वांचे रक्षण करताना बलिदान दिलेल्या

# जान्हवी शिखरला करतीये डेट?

बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री जान्हवी कपूर (JANHVI KAPOOR) ही तिच्या चित्रपटांमुळे चर्चेत असते. नुकतीच जान्हवी ही महाकाल देवाच्या दर्शनासाठी उज्जैनच्या महाकालेश्वर मंदिरात गेली होती. महाकालेश्वर मंदिरातील जान्हवीचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. ज्यामध्ये ते भजन म्हणताना दिसत आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या महाकालेश्वर मंदिरातील व्हिडिओमध्ये दिसत आहे की, जान्हवी कपूर ही सुशील कुमार शिंदे यांचा नातू शिखर पहाडियासोबत महाकाल देवाच्या भक्तीत तल्लीन झालेली दिसत आहे. जान्हवी आणि शिखर यांच्यासोबतच दिग्दर्शक अॅटलीनं देखील महाकाल देवाचे दर्शन घेतले आहे. काही दिवसांपूर्वी जान्हवी आणि शिखरने तिरुपती बालाजीचे दर्शनही घेतले होते. शिखर पहाडिया हा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री सुशील कुमार शिंदे यांचा नातू आहे. शिखर हा स्मृती शिंदे आणि संजय पहाडिया यांचा मुलगा आहे. जान्हवीचं नाव गेल्या काही दिवसांपासून शिखरसोबत जोडलं जात आहे. शिखर आणि जान्हवी यांनी त्यांच्या चाहत्यांना त्यांच्या नात्याबाबत अजून कोणतीही माहिती दिलेली नाही. पण विविध कार्यक्रमांमध्ये शिखर आणि जान्हवी यांना एकत्र स्पॉट केलं जातं. त्यामुळे जान्हवी आणि शिखर यांच्या नात्याबाबत सोशल मीडियावर चर्चा होत असते. गुंजन सक्सेना, घोस्ट स्टोरीज, दोस्ताना 2, रूही यांसारख्या हिट चित्रपटांमध्ये जान्हवीनं काम केलं आहे. मिली या चित्रपटातील अभिनयाचं अनेकांनी कौतुक केलं. जान्हवीच्या आगामी चित्रपटांची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत असतात. ती लवकरच ज्युनियर एनटीआरसोबत 'देवारा' या चित्रपटात दिसणार आहे.



# मराठमोळी राधिका आपटे झाली आई

मराठमोळी बॉलीवूड अभिनेत्री राधिका आपटे आई झाली आहे. राधिकाने तिच्या बाळाबरोबरचा फोटो शेअर करून चाहत्यांशी ही आनंदाची बातमी शेअर केली आहे. राधिकाने तिच्या बाळाची पहिली झलक दाखवली आहे. राधिकाचं बाळ एका आठवड्याचं झालं आहे. राधिका आपटे लग्नानंतर १२ वर्षांनी आई झाली आहे. दोन महिन्यापूर्वी तिने बेबी बंप फ्लॉंट करून तिच्या घरी नवीन सदस्याचं आगमन होणार असल्याची गुड न्यूज दिली होती. आता तिने बाळाबरोबरचा फोटो शेअर करत प्रसूतीनंतर ती कामावर परतली आहे, अशी माहिती दिली. राधिकाने तिला मुलगा झाला की मुलगी याबाबत सांगितलेलं नाही.राधिकाने शेअर केलेल्या फोटोमध्ये ती लॅपटॉपसमोर बसलेली दिसत आहे. तर तिच्या कुशीत बाळ आहे. तिने दिलेल्या कॅप्शनुसार तिचं बाळ एका आठवड्याचं झालं आहे. एका आठवड्याच्या बाळाच्या जन्मानंतर पहिली वर्क मीटिंग अशा आशयाचं कॅप्शन देत राधिकाने फोटो पोस्ट केला आहे.राधिका तिचं वैयक्तिक आयुष्य सोशल मीडियापासून दूर ठेवते. राधिकाने तिच्या लग्नाची माहितीही बराच काळ लपवून ठेवली होती. तिने वर्षभर डेट केल्यावर २०१२ मध्ये ब्रिटीश व्हायोलिन वादक आणि लोकप्रिय संगीतकार बेनेडिक्ट टेलरशी लग्नगाठ बांधली होती. आता राधिका व बेनेडिक्ट दोघेही एका गोंडस बाळाचे आई-बाबा झाले आहेत.मराठमोळी बॉलीवूड अभिनेत्री राधिका आपटे आई झाली आहे. राधिकाने तिच्या बाळाबरोबरचा फोटो शेअर करून चाहत्यांशी ही आनंदाची बातमी शेअर केली आहे. राधिकाने तिच्या बाळाची पहिली झलक दाखवली आहे.



# निया शर्माच्या समोर तर उर्फी पण फेल

उर्फी जावेद ही तिच्या अतरंगी फॅशनमुळे नेहमी चर्चेत असते. उर्फीचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असतात. अशातच आता आणखी एका अभिनेत्रीच्या हटके आऊटफिटची चर्चा सोशल मीडियावर होत आहे. या अभिनेत्रीचे हटके लूकमधील फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. जाणून घेऊयात या अभिनेत्रीबद्दल... अभिनेत्री निया शर्मानं खास लूकमध्ये एका बर्थडे पार्टीला हजेरी लावली. नियाच्या या लूकची चर्चा सोशल मीडियावर होत आहे. नियाचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. ज्यामध्ये ती ब्लॅक आऊटफिट, हातात ब्लॅक बॅग आणि मोकळे केस अशा लूकमध्ये दिसत आहे. तिच्या या लूकनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. निया शर्माच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या फोटो आणि व्हिडीओवर अनेक नेटकऱ्यांनी कमेंट्स केल्या आहेत. एका नेटकऱ्यानं कमेंट केली, "हिच्या समोर तर उर्फी पण फेल" तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "असाच ट्रेलर उर्फीनं घातला होता, तेव्हा तिला अनेकांनी ट्रोल केलं होतं." निया शर्मा अनेक मालिकांमध्ये काम केलं आहे. निया शर्मानं 'काली- एक अग्निपरीक्षा' या 2010 मधील मालिकेमधून अभिनय क्षेत्रात पदार्पण केलं. 'जमाई राजा' या मालिकेमुळे तिला विशेष लोकप्रियता मिळाली.'खतरों के खिलाडी' आणि 'झलक दिखला जा' या कार्यक्रमांमध्ये देखील तिनं सहभाग घेतला होता. निया ही सोशल मीडियावर विविध लूकमधील फोटो शेअर करत असते. तिच्या सोशल मीडियावरील फोटो आणि व्हिडीओवर नेटकरी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव करत असतात.



### अंतिम रेषा पार केल्याबाबत आनंदी

### विश्वविजयानंतर हरमनप्रीतची भावना

# महिला क्रिकेटच्या नव्या पर्वाची नांदी!

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**उपांत्य फेरीत बलाढ्य ऑस्ट्रेलियाला पराभूत केल्यानंतर भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरला अश्रू अनावर झाले होते. अंतिम लढतीत दक्षिण आफ्रिकेचा अडथळा पार करून पहिल्या विश्वविजेतेपदावर मोहोर उमटवल्यानंतर मात्र तिच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद आणि समाधान दिसले. महिला क्रिकेटच्या नव्या पर्वाची ही नांदी असल्याची भावना हरमनप्रीतने व्यक्त केली. याआधी दोन वेळा उपविजेतेपद मिळवल्यानंतर यावेळी अंतिम रेषा पार केल्याचा फार आनंद असल्याचेही ती म्हणाली.**

## भावना शब्दांत मांडूच शकत नाही




हरमनप्रीतच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने नवी मुंबईतील डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियमवर रविवारी झालेल्या अंतिम लढतीत दक्षिण आफ्रिकेचा ५२ धावांनी पराभव केला आणि देशभर जल्लोषाला सुरुवात झाली. भारतीय महिला क्रिकेटसाठी ही नवी पहाट ठरणार असल्याची भावना व्यक्त केली जात असून हरमनप्रीतनेही याला दुजोरा दिला.आम्ही याबाबत अनेक वर्षांपासून चर्चा करत होतो. गेल्या काही काळापासून आम्ही सातत्याने चांगले क्रिकेट खेळत होतो, पण आम्हाला मोठी स्पर्धा जिंकण्यात अपयश येत होते. परंतु या आव्हानांविना आताचा विश्वविजय इतका खास ठरला नसता," असे हरमनप्रीत म्हणाली.चाहत्यांना आपल्या आवडत्या संघाला जिंकताना पाहायचे असते. आम्हीही या क्षणाची खूप वर्षांपासून वाट पाहत होतो. आम्ही दोन वेळा खूप जवळ पोहोचलो, पण अखेरीस उपविजेतेपदावर समाधान मानले. आता अंतिम रेषा पार केल्याचा आनंद काही वेगळाच आहे. मी याबाबतची भावना शब्दांत मांडूच शकत नाही. मला माझ्या संघाचा खूप अभिमान आहे," असे हरमनप्रीतने नमूद केले.विश्वविजेत्या महिला संघात मुंबईकर जेमिमा रॉड्रिग्ज ही मोठ्या शहरातील एकमेव खेळाडू होती. कर्णधार हरमनप्रीत पंजाबमधील मोगाची, उपकर्णधार स्मृती मनधाना सांगलीची, रिचा घोष उत्तर बंगालमधील सिलिगुडीची, शफाली वर्मा हरियाणामधील रोहतकची, दीप्ती शर्मा आग्राची, श्री चरनी आंध्रमधील एरमलेची, रेणुका ठाकूर रोहरू नावाच्या डोंगराळ छोट्या शहरातून आहे. लहान शहरातील या मुलींना सुरुवातीच्या काळात बराच संघर्ष करावा लागला. प्रशिक्षण, सरावाच्या फारशा सुविधा नव्हत्या. मात्र, त्यातूनही मार्ग काढून त्यांनी भारतीय महिला क्रिकेटला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे.'लहानपणी मी मुलांबरोबर खेळायचे. आमच्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी माझ्यातील प्रतिभा ओळखली आणि त्यानंतर वर्षभरातच मी देशाचे प्रतिनिधित्व करू लागले,'' अशी आठवण हरमनप्रीतने सांगितली. आमच्या यशामुळे देशातील महिला क्रिकेटमध्ये मोठा बदल घडेल असा विश्वास हरमनप्रीतने यावेळी व्यक्त केला. आता भारतीय महिला संघाच्या यशाने देशातील लहान मुलींना प्रेरणा मिळेल आणि त्या क्रिकेटमध्ये कारकीर्द घडविण्याचा विचार करू लागतील अशी आशा असल्याचे ती म्हणाली.भारतीय महिला संघाच्या विश्वविजयात माजी खेळाडूंचेही योगदान मोठे असल्याचे हरमनप्रीत म्हणाली. यावेळी तिने झुलन गोस्वामी आणि अंजुम चोप्रा या माजी कर्णधारांचा आवर्जुन उल्लेख केला. "मी जेव्हा पहिल्यांदा भारतीय संघात आले, तेव्हा झुलनदीने मला सर्वाधिक पाठिंबा दिला. त्यावेळी मी केवळ एक प्रतिभावान खेळाडू होते. माझी शैली, तंत्र यावर बरेच काम करावे लागणार होते. मात्र, झुलनदीने कधीही माझी साथ सोडली नाही. अंजुमदीचे पाठबळही मोलाचे ठरले. ती कुठेही जाताना मला बरोबर घेऊन जायची. तिच्याकडून मला खूप गोष्टी शिकायला मिळाल्या. त्यामुळे आमच्या यशात झुलनदी आणि अंजुमदी यांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे," असे हरमनप्रीतने नमूद केले. यंदाच्या स्पर्धेत आम्हाला सलग तीन पराभवांना सामोरे जावे लागले. विशेषतः इंग्लंडविरुद्धचा पराभव जिव्हारी लागला.

## छोट्या शहरांतील मोठी प्रतिभा

त्यावेळी प्रशिक्षक अमोल मुझुमदार यांनी आम्हाला खडेबोल सुनावले होते. आपण पुन्हा-पुन्हा त्याच चुका करू शकत नाही असे त्यांनी खडसावले. तेव्हापासून गोष्टी बदलल्या. आम्ही अधिक विश्वासाने खेळण्यास सुरुवात केली. अखेरीस आम्हाला त्याचे फळही मिळाले. उपांत्य फेरीत बलाढ्य ऑस्ट्रेलियाला पराभूत केल्यानंतर भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरला अश्रू अनावर झाले होते.

# रोहितसारखं आयकॉनिक सेलिब्रेशन

## अमोल मुझुमदार यांनी मुंबईच्या मैदानावर रोवला भारताचा तिरंगा

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महिला एकदिवसीय विश्वचषक २०२५ च्या ट्रॉफीवर भारतीय संघाने आपलं नाव कोरलं. टीम इंडियाने स्पर्धेच्या अंतिम फेरीत दक्षिण आफ्रिका महिला संघाचा ५२ धावांनी पराभव करत ट्रॉफीची प्रतिक्षा संपवली. शफाली वर्मा व दीप्ती शर्मा यांची अष्टपैलू कामगिरी सामन्यात महत्त्वपूर्ण ठरली. दरम्यान विजयानंतर महिला संघाचे कोच अमोल मुझुमदार यांनी रोहित शर्माचं टी-२० विश्वचषक विजयानंतरचं आयकॉनिक सेलिब्रेशन पुन्हा केलं.**




रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखाली भारतीय महिला संघाने टी-२० विश्वचषक २०२४ चं जेतेपद पटकावलं.बार्बोडोसच्या मैदानावर झालेल्या या सामन्यात टीम इंडियाने विजय मिळवल्यानंतर रोहित शर्माने त्या मैदानावर भारताचा तिरंगा रोवला होता. आता महिला संघाच्या विजयानंतर कोच अमोल मुझुमदार यांनी डी वाय पाटील स्टेडियमच्या मैदानावर तिरंगा रोवत सेलिब्रेशन केलं.अमोल मुझुमदार यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय महिला संघाने त्यांचा पहिला विश्वचषक जिंकला. देशांतर्गत क्रिकेटमध्ये खोऱ्याने धावा करणाऱ्या अमोल मुझुमदार यांना भारतीय संघाकडून खेळण्याची संधी कधी मिळाली नाही. पण त्यांनी भारतीय महिला संघाच्या ताफ्यात एक ट्रॉफी आणण्यासाठी मोठी भूमिका बजावली. भारतीय महिला क्रिकेटमध्ये या विश्वचषक जेतेपदानंतर भविष्यात महत्त्वपूर्ण बदल होताना दिसतील.भारताच्या विजयानंतर भावुक झालेले कोच अमोल मुझुमदार म्हणाले, "माझ्याकडे शब्द नाहीयेत. मुलींचा प्रचंड अभिमान वाटतोय. त्या या विजयाच्या आणि प्रत्येक क्षणाच्या साक्षीदार आहेत."कोच पुढे म्हणाले.

## आम्ही ड्रेसिंगरूममध्ये बोलत आलो

आम्ही कधीच सुरुवातीच्या अडचणींमुळे स्वतःची ओळख ठरू दिली नाही. बहुतांश सामन्यांमध्ये आम्ही उत्कृष्ट कामगिरी केली. फक्त शेवटचा टप्पा अधिक चांगल्या प्रकारे पूर्ण करणं बाकी होतं आणि एकदा ते साध्य झालं, की मग मागे वळून पाहावं लागलंच नाही."फिटनेस आणि फील्डिंग, ह्या गोष्टींबद्दल आम्ही ड्रेसिंगरूममध्ये सतत बोलत आलो आहोत.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। मंगळवार।
। दि. 4 नोव्हेंबर 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती


## पुनावळेतील ‘7 PLUMERIA DRIVE’ सोसायटीत

# क्रीडा महोत्सव 2025चा जल्लोषपूर्ण प्रारंभ!

### आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते भव्य उद्घाटन; 13 क्रीडा प्रकारांत 570 स्पर्धकांचा सहभाग

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुनावळे येथील 7 PLUMERIA DRIVE HOUSING SOCIETY येथे आज सायंकाळी उत्साह, जल्लोष आणि क्रीडाभावनेने नटलेला “क्रीडा महोत्सव २०२५”चा भव्य शुभारंभ करण्यात आला. या सोहळ्याचे उद्घाटन चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाले.**



या वर्षीच्या महोत्सवात तब्बल १३ विविध क्रीडा प्रकारांचा समावेश करण्यात आला असून, क्रिकेट, फुटबॉल, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, टेनिस, बुद्धिबळ, कॅरम, स्क्वॅश, स्वीमिंग, बॅडमिंटन तसेच ५००० आणि १०००० मीटर धावण्याच्या स्पर्धा रंगणार आहेत. सुमारे ५७० स्पर्धकांचा उत्स्फूर्त सहभाग या सोसायटीतील क्रीडावैभव अधिक उजळवून गेला आहे. पुढील दोन महिन्यांपर्यंत या सर्व स्पर्धा रंगणार असून, लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व वयोगटांसाठी स्वतंत्र गट तयार करण्यात आले आहेत.

उद्घाटनप्रसंगी आमदार शंकर जगताप म्हणाले, “सामाजिक स्वास्थ्य आणि शांती टिकविण्यासाठी समाजात खिलाडूवृत्ती रुजविणे अत्यावश्यक आहे. अशा उपक्रमांमुळे समाज एकत्र येतो, ताणतणाव कमी होतात आणि आरोग्यदायी जीवनशैली विकसित होते.”

## शिक्षण क्षेत्रातील कामगिरीबद्दल शिवलिंग ढवळेश्वर सन्मानित

### शिक्षण विश्व: लोकमत एक्सलन्स अवॉर्ड 2025 ने गौरव

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भोसरी तसेच पुणे आणि पिंपरी चिंचवडच्या शिक्षण क्षेत्रात शिवलिंग ढवळेश्वर सर हे नाव अत्यंत आदराने घेतले जाते.14 जून 1962 रोजी जन्म घेतलेले आणि 1984 मध्ये शिक्षक म्हणून पिंपरी चिंचवड येथे रुजू झालेले सर यांनी शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे**




अत्यंत कठीण परिस्थितीत 1990 साली संत साई विद्यालयाची स्थापना करून इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणासाठी भोसरी परिसरातील विद्यार्थ्यांची धावपळ थांबवली कोणत्याही पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण न करता धार्मिक संस्कार आणि राष्ट्रप्रेम जोपासणारी पिढी घडविण्याचे काम त्यांनी गेली चाळीस वर्षे अखंड केले आहे. याबद्दल त्यांचा नुकताच लोकमत एक्सलन्स अवॉर्ड 2025 ने गौरव करण्यात आला.

भोसरी येथील संत साई विद्यालय मनशक्ती केंद्रावर आधारित शिक्षण देणारे हे शहरातील एकमेव विद्यालय असून या कार्यात त्यांच्या पत्नी सुनीता ढवळेश्वर यांचे मोलाचे योगदान आहे. मनःशक्ती प्रेरित शिक्षणातून विद्यार्थ्यांची बुद्धिवर्धन पद्धत आरोग्य वर्तन आणि अभ्यास यांचा समन्वय साधला जातो. परमपूज्य सिद्धेश्वर स्वामीजी यांना आपले आध्यात्मिक गुरु मानून त्यांनी शाळेत थिंकिंग कौशल्याचा अवलंब केला आहे.नियमित प्राणायाम योग सूर्यनमस्कार वर्ग तसेच योग प्रशिक्षण शिबिरे आयोजित करून बाल योगशिक्षक तयार करण्याचे कार्य सातत्याने चालू आहे.

याबद्दल शिवलिंग ढवळेश्वर म्हणाले, शाळेत आर्मी वेल्फेअर फंडासाठी योगदान, मुलांना सहा भाषांतील प्रतिज्ञा, क्रांती सप्ताह, कन्या पूजन, गुरुपौर्णिमा, मातृ पितृ पूजन दिन, चतुर्थश्रेणी कर्मचारी सत्कार, गणित व विज्ञान प्रदर्शन आणि कला हस्तकला प्रदर्शन अशा विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला चालना दिली जाते. आज या शाळेला 35 वर्ष पूर्ण झाली असून 2500 हून अधिक विद्यार्थी घडविले गेले आहेत.

ढवळेश्वर सरांच्या या उल्लेखनीय कार्याचा गौरव विविध पुरस्कारांनी झाला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा आदर्श शिक्षक पुरस्कार, जिल्हा परिषदेचा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार, जैन समाजाचा अहिंसा पुरस्कार, भोसरीचे दीपस्तंभ पुरस्कार, जीवन गौरव पुरस्कार, साने गुरुजी विचार साधना पुरस्कार आणि बसवभूषण पुरस्कार अशा अनेक सन्मानांनी त्यांचा गौरव करण्यात आला आहे.

## कुदळवाडी चिखली परिसरातील नागरिकांसाठी

# मोफत महाआरोग्य शिबिर!

### भारतीय जनता पक्ष युवा मोर्चा पिंपरी चिंचवड अध्यक्ष दिनेश यादव यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय जनता पक्ष युवा मोर्चा पिंपरी-चिंचवड शहराच्या वतीने शहराध्यक्ष दिनेश लालचंद यादव यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत महाआरोग्य तपासणी शिबिर व शासकीय योजना आपल्या दारी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. चिखली कुदळवाडी परिसरातील नागरिकांना या शिबिराचा मोठा लाभ घेता येणार आहे.**




या शिबिराचे उद्घाटन भाजपा नेते तथा भोसरी विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते ५ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता करण्यात येणार आहे. यावेळी नागरिकांना विविध आजारांची मोफत तपासणी व औषधोपचार या ठिकाणी उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

शिबिरामध्ये मोतीबिंदू शस्त्रक्रिया, मुळव्याध शस्त्रक्रिया, नॉर्मल व सिझेरियन डिलिव्हरी, फिजिओथेरपी, चामखीळ, मोस, मस्सा काढणे, तात्काळ वेदना शमन चिकित्सा यांसह अनेक उपचार मोफत स्वरूपात केले जाणार आहेत. तसेच महात्मा फुले जन आरोग्य योजना अंतर्गत तपासणी व सल्ला मार्गदर्शन, मोफत लसीकरण (बालकांसाठी) आदी सुविधा देखील उपलब्ध असतील.

**शासकीय योजनांची माहिती आणि मार्गदर्शन**

याशिवाय शिबिरात नागरिकांना विविध शासकीय योजनांची नोंदणी व मार्गदर्शन मिळणार आहे. यात वयोवंदना कार्ड, माझी लाडकी बहीण योजना KYC, सुकन्या समृद्धी योजना, आयुष्मान भारत कार्ड, ई-श्रम कार्ड, आभा कार्ड, घरगुती कामगार कल्याण योजना, क्रांतीज्योती बाल संगोपन योजना अशा अनेक योजनांचा समावेश आहे.

**येथे घ्या शिबिराचा लाभ**

श्री. तात्यासाहेब सपकाळ क्रिडांगण, आण्णासाहेब बँक समोर, कुदळवाडी, चिखली येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, या शिबिराचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी आधार कार्ड, रेशन कार्ड आणि आधार लिंक असलेला मोबाईल नंबर सोबत आणावा, असे आयोजकांनी कळवले आहे. अधिक माहितीसाठी ९७६३९००७७५ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

> "या शिबिराचा उद्देश म्हणजे समाजातील सर्व घटकांपर्यंत आरोग्य व शासकीय योजनांचा लाभ पोहोचवणे हा आहे. आरोग्य शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना प्राथमिक उपचार घराजवळ मिळतील. तसेच शासकीय योजनांची देखील माहिती मिळेल. नागरिकांनी या उपक्रमाचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा,"
> **दिनेश यादव,** अध्यक्ष, भाजपा युवा मोर्चा पिंपरी चिंचवड शहर.

## वाकडमध्ये अर्बन स्ट्रीटच्या नावाखाली चुकीचे काम सुरू

### काम न थांबवल्यास तीव्र जनआंदोलन, आरपीआयच्या कुणाल वाव्हळकरांचे आयुक्तांना निवेदन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**वाकड परिसरातील सम्राट चौक ते वाकड चौक दरम्यानच्या दत्त मंदिर रस्त्यावरील "अर्बन स्ट्रीट" प्रकल्पांतर्गत सुरू असलेले काम चुकीच्या पद्धतीने होत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या कामामुळे स्थानिक नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी व्यक्त होत असून, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) चे शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर यांनी पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांना निवेदन देऊन हे काम तातडीने थांबवावे, अन्यथा तीव्र जनआंदोलन उभारले जाईल, असा इशारा दिला आहे.**



**भूमिपुत्रांनी दिली जमीन; पण विकासात झाला भ्रमनिरास**

वाव्हळकर म्हणाले, "वाकड परिसरातील भूमिपुत्रांनी दत्त मंदिर रोडचा विकास व्हावा यासाठी स्वतःच्या जागा दिल्या. या रस्त्याला ४५ मीटर रुंदी देण्यात यावी, अशी अपेक्षा होती. मात्र, प्रत्यक्षात अर्बन स्ट्रीटच्या नावाखाली ४५ मीटरचा रोड फक्त २४ मीटर करण्यात आला आहे. उर्वरित जागा ड्रायव्हे पार्किंग, फुटपाथ, ट्री लाईन, सायकल ट्रॅक, ड्रॉप ऑफ झोन आणि पार्किंगसाठी वापरली जात आहे. हा बदल लोकहिताचा नसून काही बिल्डर्स आणि व्यापाऱ्यांच्या सोयीसाठी करण्यात आल्याचा संशय व्यक्त होत आहे."

**"अधिकाऱ्यांचे आणि बिल्डरांचे हितसंबंध जपले जात आहेत का?**

या प्रकल्पामागे महापालिका अधिकाऱ्यांचे आणि बिल्डर लॉबीचे हितसंबंध जपले जात असल्याचा गंभीर सवाल वाव्हळकर यांनी उपस्थित केला आहे. त्यांनी म्हटले, "अर्बन स्ट्रीटच्या नावाखाली नागरिकांची दिशाभूल केली जात आहे. रस्ता कमी करून सायकल ट्रॅक व पार्किंगसाठी जागा देणे म्हणजे वाहतूक कोंडी आणखी वाढवण्यासारखे आहे. यामागे कोणाचा फायदा साधला जात आहे, याचे स्पष्टीकरण महापालिकेने द्यावे."

**दररोजचा वाहतूक त्रास; नागरिक त्रस्त**

वाकड परिसरात सध्या २०० ते २५० सोसायट्या असून, हजारो नागरिक दररोज प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करत आहेत. विशेषतः दत्त मंदिर रोडवर सकाळ-संध्याकाळ वाहतुकीचा ताण वाढतो. अशा परिस्थितीत रस्त्याची रुंदी कमी करून पादचारी व सायकल ट्रॅकसाठी जागा राखून ठेवणे ही नागरिकांवरील अन्यायकारक भूमिका असल्याचे मत स्थानिकांनी व्यक्त केले आहे.

**जनआंदोलनाची चेतावणी**

कुणाल वाव्हळकर यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, "अर्बन स्ट्रीट प्रकल्पातील चुकीचे काम तात्काळ थांबवून रस्त्याची रुंदी वाढविण्यात यावी. अन्यथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया नागरिकांना घेऊन मोठे जनआंदोलन उभारेल. महापालिकेने विकासाच्या नावाखाली जनतेचा विश्वासघात करू नये."

**वाकडमध्ये आंदोलन पेटण्याची शक्यता**

अर्बन स्ट्रीटच्या नावाखाली वाकडमधील दत्त मंदिर रोडवरील चुकीच्या रस्त्याच्या कामावरून नाराजी उफाळली आहे. भूमिपुत्र आणि स्थानिक नागरिकांना न्याय मिळावा, यासाठी रस्ता रुंद करण्याची मागणी होत आहे. महापालिका प्रशासनाने लवकर निर्णय घेतला नाही, तर वाकडमध्ये आंदोलन पेटण्याची शक्यता नाकारता येत नाही.


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
Admission Open
FOR 2026 – 27
Nursery – Std X
• CBSE Curriculum
• Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
• Digital Classrooms with AV Facilities
• Skill Development Programs including:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
• Focus on Holistic Development
Enroll Now!
Sunday Open: From 10 AM to 1 PM
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION OPEN
FOR THE YEAR 2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune